(6)

# D.P. Bhosale College, Koregaon

Tal. Koregaon, Dist. Satara (MS), INDIA
(Affiliated to Shivaji University, Kolhapur)
NAAC Re-accredited 'A' Grade (CGPA 3.12)
ISO 9001:2015 Certified

Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

March -2019 Special Issue - 171 (B)




## आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद स्मरणिका
## भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब

अतिथी संपादक
डॉ.व्ही. एस. सावंत
प्राचार्य
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव
ता. कोरेगाव, जि. सातारा

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर (येवला)

कार्यकारी संपादक
डॉ. बी. एस. चव्हाण
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव
ता. कोरेगाव, जि. सातारा

सहयोगी संपादक
श्रीमती एम. एम. देठे
डॉ. व्ही. व्ही. नावडकर

Swatidhan Publications

For Details Visit To : www.researchjourney.net

| | | | |
|---|---|---|---|
| 36 | भटक्या विमुक्तांची श्रमसंस्कृती, कला व साहित्य यांचे स्वरूप | डॉ.सौ.एस.बी.वाघमोडे | 180 |
| 37 | गोपाळ – डोंबारी जमातीची संस्कृती : सद्यस्थिती | प्रा. सुभाष वाघमारे | 183 |
| 38 | 'तीन दगडाची चूल' मधील अंधश्रद्धा | भारती कोळेकर | 189 |
| 39 | भटक्या – विमुक्तांचे साहित्य व स्वरूप | राजनंदिनी भालेराव | 195 |
| 40 | मला माहित असलेली भटक्या विमुक्तांची कला | डॉ.सविता व्हटकर | 199 |
| 41 | व्यंकटेश माडगूळकरांच्या कादंबरीतील धनगर समाजाचे चित्रण | प्रा.प्रमोद शेटे | 203 |
| 42 | भटक्या – विमुक्तांच्या जातपंचायती आणि महाजातपंचायतीचे स्वरूप व महत्त्व | डॉ.चंद्रकांत कांबळे | 206 |
| 43 | भटक्या विमुक्तांचा साहित्यप्रवाह आणि मराठीतील इतर साहित्यप्रवाह : तुलनात्मक अभ्यास | डॉ. निलेश लोंढे | 212 |
| 44 | भटक्या विमुक्तांची आत्मकथने | कल्पना काळे | 219 |
| 45 | भटक्या – विमुक्तीचे व्यवसायानुसार वर्गीकरण व स्वरूप | किरण मंडळ | 225 |
| 46 | भटक्या विमुक्त जमातीतील 'वडार' समाजचित्रण | राजनंदिनी किर्तीकर | 231 |
| 47 | भटक्या – विमुक्तांचे स्वरुप व साहित्य | प्रा. कुमार इंगळे | 235 |
| 48 | भटक्या विमुक्तांचे व्यवसायानुसार वर्गीकरण व स्वरूप | जयश्री वाहुळ | 245 |
| 49 | भटक्या विमुक्तांचे व्यवसायानुसार वर्गीकरण व स्वरूप | प्रा. कु. लक्ष्मी पवार | 250 |
| 50 | भटक्या-विमुक्तांच्या आत्मचरित्रातून सामाजिक जाणिवांचा चिकित्सक अभ्यास | डॉ. नंदकुमार जाधव | 255 |
| 51 | 'भटक्या-विमुक्तांची श्रमसंस्कृती कला आणि साहित्य | डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर | 258 |
| 52 | कैकाडी समाज | ज्योती लेकुळे | 262 |
| 53 | मराठी कादंबरीतील विमुक्तांचे चित्रण | डॉ. आकाश पवार | 266 |
| 54 | भटक्या विमुक्तांचे- व्यवसायानुसार वर्गीकरण व स्वरूप | प्रा.देवदास आरोलकर | 269 |
| 55 | भटक्या जमातीतील स्त्री लेखिकांच्या आत्मकथनातील स्त्रीजीवन | डॉ. दत्तात्रय ओवाळे | 273 |
| 56 | गोसावी समाजाचे लोकजीवन | प्रा. घनश्याम गिरी | 277 |
| 57 | 'गोठण'मधील गोर बंजारा संस्कृती | डॉ. गिरीश मोरे | 280 |
| 58 | भटक्या विमुक्त धनगर समाजाची ग्रामदैवते | डॉ. तानाजी पाटील | 283 |
| 59 | 'तीन दगडाची चूल' या आत्मकथनाची समाजशास्त्रीय समीक्षा | डॉ. दत्तात्रय डांगे | 290 |
| 60 | भटक्या विमुक्तांचे साहित्य : संकल्पना, स्वरूप व वाटचाल | डॉ. नीता भिसे – ढावरे | 294 |
| 61 | वैदू समाजाचे राहणीमान व चालीरीती | डॉ. शरद पवार | 302 |
| 62 | लोककला - 'वासुदेव' : परंपरा आणि सद्यस्थिती | डॉ. महेश गायकवाड | 305 |
| 63 | भटक्या विमुक्तांच्या समस्या | डॉ. मोहन लोंढे | 310 |
| 64 | भटक्या विमुक्ताची संस्कृती | डॉ.रघुनाथ केंगार | 314 |
| 65 | भटका विमुक्त समाज: शैक्षणिक व सांस्कृतिक समस्या | डॉ. प्रभाकर पवार | 318 |
| 66 | भटक्या विमुक्त जाती जमाती व जातपंचायत : परस्पर अन्वय | डॉ. अशोक शेलार | 321 |
| 67 | धनगर जमातीची श्रम सांस्कृती व कलाविष्कार | संदीप पाटील | 328 |
| 68 | संघर्षमय जीवनाची कहानी 'उचल्या' आत्मकथन | डॉ.कांचन नलावडे | 332 |
| 69 | भटक्या विमुक्तांची कला, साहित्य आणि श्रमसंस्कृती | डॉ.शिवकुमार सोनाळकर | 334 |
| 70 | ठसठसणारं दु:ख म्हणजे 'उपरा' | प्रा.राजेंद्र निकुंभे | 339 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Issue 171 (B)- भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब | March-2019
UGC Approved Journal

# 'तीन दगडाची चूल' मधील अंधश्रध्दा

**भारती श्रीधर कोळेकर**
संशोधक, मराठी विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
bharatikolekar2012@gmail.com
भ्रमणध्वनी 7875694568

**प्रस्तावना**

साहित्य हा समाजाचा आरसा आहे जे जे समाजात घडते ते ते साहित्यात प्रतिबिंबित होत असते. १९६० नंतरच्या काळात दलित, भटके, विमुक्त यांनीदेखील साहित्यलेखनाच्या माध्यमातून आपले जीवनानुभव चित्रित केलेले दिसून येतात. त्यांच्या साहित्यात इतर लालित्यपूर्ण गोष्टी वगळल्या जाऊन त्यांचे जगणे आणि त्यांच्या समाजाचे भोगलेपण आले आहे. दलित, भटक्या, विमुक्तांची आत्मकथने ही तर समाजमनाचा महत्वाचा दस्तऐवज आहेत. यामध्ये प्रामुख्याने उपरा, गबाळ, बेरड, उचल्या तांडा, मरणकळा, कोल्हाट्याचं पोर, ऐरणीच्या घणा, आत्मकथा : काटेरी तारेच्या कुंपणाची, भटक्या, फिरस्तु, तीन दगडाची चूल, भंगार इ. आत्मकथनांचा उल्लेख करता येईल. प्रत्येक आत्मकथनांमध्ये लेखकाने आपल्या जमातीच्या व्यथा, वेदना, अंधश्रध्दा, रूढीपरंपरा यांचे प्रत्ययकारी दर्शन घडविले आहे. त्यातही स्त्रियांच्या आत्मकथनातून प्रकट झालेले स्त्री जीवन हे वेदनेने, करूणेने ओथंबलेले आहे. दारिद्रय, भूक, अज्ञान यांनी वेढलेले आहे. हातावर पोट भरणाऱ्या व डोक्यावर उभा संसार वाहणाऱ्या भटक्या विमुक्त जमातीतील स्त्रिया या कष्टाचे मूर्तिमंत प्रतीक ठरतात. तिची कुटूंबात होणारी फरपट ही दारिद्रय, अस्पृश्यतेने बहाल केलेली असली तरी अज्ञान हे त्यामागील मुख्य कारण आहे. याचेच चित्रण त्यांच्या आत्मकथनातून आले आहे.

विमल मोरे यांचे 'तीन दगडाची चूल' हे आत्मकथन सामाजिक सांस्कृतिक अंगाने दखलपात्र ठरले आहे. अज्ञान अंधश्रध्देच्या खोल खाईत अडकलेल्या आणि रूढीपरंपरांच्या चक्रात गुरफटलेल्या भटक्या-विमुक्त जमातीत, 'गोंधळी' जमातीत जन्मलेल्या विमल दादासाहेब मोरे, पूर्वाश्रमीच्या विमल नामदेवराव भोसले या लहानपणापासूनच अन्याय, अत्याचार, अगतिकता, अवहेलना सहन करत वाढलेल्या व लग्नानंतर 'कुडमुडे जोशी' या जमातीतील जीवन अनुभवलेल्या व भोगलेल्या. हे त्यांचे अनुभव, जगणं, भोगणं त्यांनी 'तीन दगडाची चूल' मध्ये शब्दबध्द केले आहे.या आत्मकथनातील 'अंधश्रध्देचे चित्रण' या सूत्राचा विचार प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**'तीन दगडाची चूल' मधील अंधश्रध्दा :**

या आत्मकथनामध्ये अनेक घटना प्रसंगांच्या अनुषंगाने अंधश्रध्देचे चित्रण केलेले दिसून येते. ते पुढील प्रमाणे-

**१) एखादं बोट सोडून जेवलं तर घरातली माणंसे मरतात.**

गोंधळी जमातीत जेवताना पाची बोटं तोंडात घालून जेवण हा नियम. कारण एखादं बोट सोडून जेवला तर घरातील माणसं मरतात. असे समजले जात असे. इमीला धुणं धुताना दगड लागल्यामुळे त्या

बोटाला तिखट लागू देत नव्हते. म्हणून ती बोट मोडून जेवत होती. त्यामुळे मऱ्याप्पाने तिच्या पाठीत जोरात लाथ मारली व थपाटाही मारला. तेव्हा मऱ्याप्पाला आई म्हणते, "मार अजून त्या कार्टीला... समद्यांळी मारून एकटी ऱ्हावावं म्हणतीया." "हगे, पाची बोटं तोंडात घालून जेवणार असशील तर जेव, न्हाय तर ऊट!" (पृ.क्र.२२)

**२) पालजत्रेला कोंबड्या बकऱ्यांचा बळी देणे.**

गोंधळी जमातीत 'पालजत्रा' केली जायची, म्हणजे देवळासमोर छोटंसं पाल करायचं त्यावेळी सगळ्यांच्याकडून वर्गणी जमा करून बोकड आणून त्याचा बळी देवून त्याचं सामुदायिक जेवण करून प्रसाद म्हणून खायचा असा रिवाज आहे.

**३. व्यंग मूल जन्माला आले तर ते माणूस नसून भूत जन्माला आले समजून त्याला मारून टाकणे.**

इमीची चुलती गोजराकाकीच्या अचानक पोटात जास्त दुखू लागले. तेव्हा येसाईच्या अंगात देवी येते. व ती देवी म्हणते, "गोजराला भूतानं झपाटलंय, तवा लिंबू, कोंबडं उतरून टाका." (प्र.क्र.५४)

त्यावेळी पालात एकही कोंबडं नव्हतं. रात्री-अपरात्री व अचानक कोंबडं कुठून आणायचं असा प्रश्न पडला शेवटी खडतीतल्या डब्यातला वाळला लिंबू काढून गोजराकाकीवरून उतरून टाकला जातो. याचा काहीच उपयोग होत नाही. आणि गोजराला अर्धवट शरीर असलेलं असं व्यंगमूल जन्माला आले म्हणून येसाईनं त्यावेळी धाडसानं मुलाचा गळा आवळून मारून टाकले. दुसऱ्यावेळाही गोजराच्या पोटी चार डोळ्याचं व्यंग मूल जन्माला आल्याचे इमीच्या वडिलांना यल्लव्वाआत्या सांगताना म्हणते, "नामदेवदादा....घात झालाय....गोजराच्या पोटाला वेंद मासकलंय! (भूत जन्माला आलंय)." या भूताचं काय करायचं हा मोठा प्रश्न सर्वांना पडलेला व भीतीही लागून राहिली होती. तेव्हा यल्लव्वाआत्या म्हणाली "गड्यांनो, माजं ऐका... ही जगलं तर लय वंगाळ हुईल... घरादारचा नायनाट व्हुईल..." यल्लव्वाआत्याला पूर्ण बोलू न देताच फुलाकाकी म्हणाली, "ही वेंद हाय. मोटं हुईल तसं समद्यांळी खात सुटील... तवा ही गेल्यालंच बरं हुईल.." (पृ.क्र.५४) असं म्हणून सर्वजण त्याच्या मरण्याचीच वाट बघू लागले.

**४. मुलामुलींचे जावळ काढले नाही तर मुलं जगत नाहीत.**

गोजराकाकीची दोन्ही मुलं गेल्यानंतर सर्व बायका देवधर्मावर चर्चा करत बसल्या असताना यल्लव्वाआत्याला मात्र 'देवाचं काहीतरी करायचं राहिल्या असणार त्या शिवाय अशी मुलं जन्माला येत नाही' असे वाटते. त्याचवेळी इमीची आई तिला सर्वांची जावळ काढावी लागतात का? हेही विचारले तेव्हा ती म्हणते, "व्हय... पोरांची पुरींची समदीच जावळं काढाया लागत्यात. जर काडायचीच नसली समदी जावळं, तर पाच सोन्याची जावळं करून माणकीगुराच्या सटवाईला घालाला लागत्याती." हा या जमातीतील रिवाज. पण खर्चामुळं इमीच्या घरच्यांनी आतापर्यंत कुणाचंही जावळ काढलं नव्हतं. सटवाईचा कोप म्हणूनच गोजरा, अशोक, सखवदा यांची मुलं-मुली मेली असे त्यांना वाटते तेव्हा यल्लवा म्हणते. "हं... म्हणूनच गोजराची पोरं जगत न्हायीती ... तुम्ही इतकी वरसं झाली सटवाईला गेला न्हाय." 'खरंच वया तिती पोरं मिली. आश्याची पयली पोरगी मिली... गोजराची दोन लेकरं पाटोपाट डबऱ्यात घातली... आनं सखवदेच्या दोन्ही हत्तीवाणी पुरी गेल्या." (पृ.क्र.५८)

**५. देवावर उष्टं पाणी टाकल्यानं एखादा आजार होऊन तो बळावतो.**

इमीला अंगावर पुरळ उठून ते बळावले होते. त्यात पू झाला. ते फोड फुटून त्याची लस सर्वत्र पसरली व अंगावर मोठमोठ्या जखमा झाल्या होत्या. हा गोवर आहे ७ दिवसात आपोआप बरा होईल म्हणून कोणताही औषधोपचार केला नाही. पण इमीची अवस्था फारच केविलवाणी झाली होती. त्यावेळेस तिला पहायला आलेल्या घाडगेमावशी इमीच्या आईला याचे कारण सांगताना म्हणते, "आहो... एक महिना झाला या गोष्टीला. मी तुमच्या नळावर देव घासायला घिऊन आली होती. देव घासताना माझा हात राखीनं भरला, म्हणून मी हिला म्हनलं... माझ्याकडं बोट दाखवत घाडगीन मावशी म्हणाल्या 'देव धुवायला थोडं पाणी टाक...' ही पानी पीत हुबी हुती, हिनं नळाचं ताजं पाणी टाकायचं सोडून उष्टं पाणी देवावर ओतलं. मी लई चिडली होती हिच्यावर. तेव्हा बोलले सुध्दा, देव आता या पोरीला कायतरी करील आणि थोड्याच दिवसात असं झालं." (पृ.क्र.६६)

**६. उपवासाने, नवससायासाने आलेले संकट दूर होते.**

घाडगेमावशीचे बोलून झाल्यावर इमीची आई दोन्ही गालावर मारून घेत "तोबा-तोबा' म्हणून पुटपुटली आणि म्हणाली, "दिवी... माज्या लेकरांकडनं चुकलं आगलं... मापी कर. म्या उद्याच तुजा उपास धराया लावीन तिला. पाच मंगळवार आनि पाच शुकुरवार कराला लावते; आनं यल्लमा, तुज्या नावानं तीन वर्स लिंबं नेसवते पुरीला..." (पृ.क्र.६६,६७)

कमलआक्काची मुलगी प्रमिलाला मासिक पाळी येत नव्हती त्यासाठी कितीतरी डॉक्टरांनाही दाखवलं, पपया खाल्ल्या दोनतीन वेळा तीन वर्षांचा लिंबही नेसवला, तिला सोळा शुक्रवारचे व्रतही निरंकार करावयास लावले ती देवपूजापण रोज करायची पण एवढं करूनही तिला शेवटी मासिक पाळी आलीच नाही. तरीही कमलआक्का व तिचा नवरा कोणी काय सांगेल ते सतत बसता-उठता देव-देव करत.

इमीच्या बाबांच्या तब्येतीत थोडीफार सुधारणा झाल्यावर तिची आई अशोकदादाला म्हणते, "यल्लमाला जायला पायजी व्हुतं.... इमीला दुकं उठल्यावर लिंब नेसाचं मागून घेतलं हुतं... तीच पीडा लागलीय... आनं तुज्या बाला बरं वाटावं म्हणून यल्लमाला चांदीचं डोळं घालती म्हनून मागून घेतलंय... तवा दिवीला जाऊन यीती." (पृ.क्र.११२)

विमल व मोरेंना मूलबाळ नव्हतं. त्यामुळं तिची सासू म्हणायची "लगनात देवाचं केलं न्हाय म्हणून मूलबाळ व्हत न्हाय." मामी पुष्कळ देवाना नवस करायची. अंगात येणाऱ्या बाईकडून माझ्या ओटयात गणोबा घालायला लावायची. (पृ.क्र.२०५)

**७. मंत्र तंत्र अघोरी उपायाने आजार बरा होतो, गृह शांती होते.**

अशोकचा मित्र परब गावठी औषध देणारा व भूत काढणारा. 'त्यांनंही बऱ्याच झाडांच्या मुळ्या आणून दिल्या, हाडकापासून तयार केलेली माळही इमीच्या गळ्यात घालतो. व रोज सकाळी उठून घरात सगळीकडं गोमूत्र शिंपडून या माळेची पूजा उदकाडीनं करायची शिवाय शंभरवेळा सकाळ संध्याकाळी एक मंत्र म्हणायला देतो व अंगारा देऊन उजवीकडं तोंड करून फुंकायला सांगतो.'

इमी पोटात दुखू लागल्यावर घरी सांगत नाही कारण आईन लिंबाचा रस प्यायला दिला असता. किंवा "तीन दामटयाची भाकरी नाहीतरी तीन वाटेवरची माती, मिरच्या, मोहरी उतरून टाकली असती." (पृ.क्र.१२६) असे कारण शोभास सांगते.

तसेच दादासाहेब व विमल मोरे अंधश्रध्दा निर्मूलन कार्यक्रमास गेले असता वडांगळे गावात एका कार्यकर्त्याच्या समोरील घ्रात एक मांत्रिक स्त्रियांना ताईत, दोरे वगैरे देत असतो. तेव्हा तेथील स्त्रिया त्या बुवाचं कौतुक करत होत्या तेंव्हा एक बाई म्हणते, "माज्या लिकीचं लगीन ठरत नव्हतं पर ह्येनं दोरा दिला आनं गेल्या वरसालाच लिकीचं लगीन झालं...... आन अवंदा बाळातपणाला लेक म्हायारला आल्याया" (पृ.क्र.२०६) तर दुसरी एकजणतर घरची परिस्थिती हालाखीची असूनही " देवरशीबाबा, माज्या घराची शांती कर. घरामधी समदं बरकत यीवदी..... आवंदा शेतात पीकपाणी यीवूदी. किती राबलं तर पोटाला पुरत न्हाय...." (पृ.क्र.२०६,२०७) असं म्हणून घरात काही पैसे नसताना घरातील घागर विकून घराची शांती करायला तयार होते. वरती आणि 'काम झाल्यावर तुमाला कापडं करती' असं देवरशाला म्हणते.

नेमका, काय प्रकार आहे हे पाहण्यासाठी मोरे व विमल तेथे जातात विमलच्या पोटात दुखायचे नाटक करता. तेंव्हा तो देवरशी लोटक्यातली राख पुडीत बांधून देत सांगतो, " पुरी... राती झोपताना ह्यो अंगारा पाण्यात कालवून पी. आनं कपाळाला लाव..... वाहिरवासा झालाय .... म्या उतारा टाकतो. वीस रूपयं द्या." (पृ.क्र.२०७) म्हणतो. जेंव्हा त्या देवरशास त्याचे पितळ उघडे करण्यासाठी शिबीरात आणले जाते. तेंव्हा पोटात दुखायच अजून कमी नाही म्हटल्यावर देवरशी काहीतरी मंत्र म्हणून चिमूटभर अंगारा ग्लासभर पाण्यातून विमलला प्यायला सांगतो. तरीही कमी नाही म्हटल्यावर बुवांनी " एका लिंबाला हळद-कुंकू लावून ते लिंबू राजू नाईक यांच्याकडं दिले आणि म्हणाले, "सात येळा झाडाच्या अंगावरून लिंबू उतरून डावीकडं फेका म्हणजे भूत निगून जायील" भूत उतरण्याचा हा प्रकार पाहून विमलला हसू येत होते. पण बुवा मात्र "भूत झाडाच्या अंगातून निघून चाललंय !" असे म्हणायचा. त्यातच वडबडू लागला, "हया झाडाला सोड.... न्हायतर म्या माज्या मंतरानं तुला जाळून टाकीन......सोड सोड..."

"म्या जातू....जातू... मला उतारा टाका. त्वा कोन हाय......? बोल, त्वा कोन हाय? म्या गडी हाय...... म्या जातू." (पृ.क्र.२०९) अशी लोकांची फसवणूक करून बुवा लोकांकडून पैसे काढत असे.

**८. डॉक्टरपेक्षा देवावर जास्त विश्वास.**

कोणत्याच घरगुती/अघोरी उपायांनी इमीचा आजार वरा होत नव्हता. व आई इमीला दवाखान्यात घेऊन जायला पण तयार नव्हती तिचा देवावर फारच विश्वास होता. ती म्हणायची, "माझा देव समदं चांगलं करील तुमी उगंच दवाखन्यात न्हिवून जास्त करून ठिवाल...."

इतकेच नव्हे तर इमी वरी झाल्यानंतर सर्वजन पालावर जायला निघतात तेंव्हा तिची आई नकार देवून ती माणकेश्वराच्या सटवाईला जायच ठरवते. "त्या विगार आमच्या घराम्हाग लागल्याला फेरा चुकायचं न्हाय....." (पृ.क्र.६९) असं तिला वाटते. आईच्या या अडाणी पणाची समजूत काढताना अशोक म्हणतो, "आई, पडण्याचा नि देवीचा काय संबंध?" तेव्हां उलट ती देवीवरील विश्वासामुळे अशोकला ओरडते, "आश्याऽऽ, लय श्येना व्हू नगूस समद्या घरावाराला मातीत घाटल्यावर तुजं समादान व्हुईल. माजी सोन्यासारखी पुरगी मरील..." (पृ.क्र.६९) शेवटी सर्वजणच व्याजाने का होईना पैसे घेऊन सटवाईला जातात व सर्वांचे जावळ काढून येतात.

**९. लग्नापूर्वीच एखादया मुलीस पहिला मुलगा की मुलगी होईल? हे पाहणे.**

इमीला पहिलं न्हाणं आल्यानंतर तिची काकी तिला गव्हाची पाच फळ करून खावयास देते त्या प्रत्येक फळात खारीक, बदाम, हळकुंड, खोबरं, सुपारी अशी एकएक फळे स्वतंत्र घालून ती उकडलेली फळे तिला खायला देते. खाताना त्या कणकेच्या फळात जे फळ निघेल त्यावरून इमीला पहिला मुलगा होईल की मुलगी हे पाहिले असता त्यात पाहिली सुपारी निघाली तेव्हा इमीची आई इमीवर भडकते, "तुला कळत नव्हतं का नीट वगाया? खायाची घाई झालती? कुटं पळून जात नव्हतं? तुलाच खायला देत व्हुते." पण सुपारी निघाल्यावर काय झालं? हे तिला विचाऱ्या इमीला कळत नव्हतं. तेव्हां तिची काकी सांगते " सुपारी निघाल्यावर पहिली पुरगीच व्हुतीया." व " हळकुंड निगाल्यावर पोरगं हुतया." (पृ.क्र.१३०)

**१०. अंगात येणे.**

इमीच्या लग्नाच्यावेळी मोरेंकडील वऱ्हाड रात्री बराचवेळ झाला तरी आले नव्हते. त्यामुळे इकडील मंडळींमध्ये त्यावरून वऱ्यावाईट चर्चा सुरू झाल्या. त्यामुळे भीती व काळजीनं इमीच्या पोटात दुखू लागले. मऱ्याप्पा डॉक्टरला बोलवायला जातो तोपर्यंत सीतामामीच्या अंगात येऊन ती घुमत राहते तेव्हा आंबू आक्का व आई तुला काय पाहिजे ते माग पण इमीला बरं कर म्हणायच्या तेव्हा सीतामामी घुमतच म्हणाली, "मी बाळातीन हाय.... तू बाराच्या टायमाला माज्या फिरीत आलीस.... हाळदीच्या आंगान हिरवा चुडा घालून हासत हुवी व्हुतीस...." म्या तुला घिवून जाणार."

"पिवळा भातsss एक कोंबडा.... पाच चपात्या.... काजाssळ, हिरव्या बांगडयाsss आनि लिंबू. आज साळंच्या म्हागं उतरून टाक... तरच मी जानार... न्हायतर तिला माज्या बरूबर घिऊन जानार हाय..." (पृ.क्र.१४८) असा उताराही टाकायला सांगते आणि उतारा द्यायचं कबूल केल्यावरच तिच्या अंगातलं जातं.

**११. इतर अंधश्रध्दा.**

- देव-देवीकडून नवस फेडून येताना मागं फिरून बघू नये. (पृ.क्र.७२)
- देवादिकांसाठी / नवससायासासाठी खर्च केला तर तो खर्च म्हणू नये." (पृ.क्र.७४)
- मुलाचं बारसं केलं किंवा हौसमौज केली की लेकरू मरतं. (पृ.क्र.७६)
- मेलेल्या माणसाची चादर/वाकळ घरी आणली तर त्याबरोबर ती व्यक्ती भूत होऊन घरी येते. (पृ.क्र.७६)
- प्रेतयात्रेबरोबर लहान मुलींनी गेले की भूत लागतं. (पृ.क्र.८९)
- देवीला घातलेल्या पाणी तीर्थ म्हणून पिल्याने नायटा, खरूज उटत नाही मग त्यात हळदीकुंकू, उदबत्तीची राख, पायाची धूळ मिसळली असली तरीही. (पृ.क्र.११३)
- मासिक पाळीच्यावेळी तुळशीला पाणी घातले असता ती तुळस बाळली/जळाली नाही तर मासिक पाळी चांगली आहे असे समजून पाळली नाही तरी चालते. (पृ.क्र.१३७)
- सकाळी सकाळी नको त्या एखाद्या व्यक्तीचं तोंड पाहिलं तर काम होत नाही. (पृ.क्र.९६)
- नजर लागणे अथवा काढणे. (पृ.क्र.१६६)

एकूणच विमल मोरे यांच्या 'तीन दगडाची चूल' या आत्मकथनपर साहित्यातून 'अंधश्रध्दांचे चित्रण' हे सूत्र नेमकेपणाने चित्रित केलेले दिसून येते. ज्या समाजामध्ये त्या जगल्या त्या समाजात

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 171 (B)- भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
March-2019

शिक्षणाअभावी घडलेले अनेक अंधश्रध्दायुक्त प्रसंग आले आहेत. यामध्ये लेखिकेची दृष्टी ही अशा प्रश्नांना सामोरी जाऊन वाचा फोडून परिवर्तन घडविण्याची असलेली दिसते. काही प्रसंगात लेखिका स्वत: या अंधश्रध्दांना विरोध करताना दिसते. उदा : 'पाची बोटे तोंडात घालून न जेवल्याने घरातील माणसे मरतात' या प्रसंगी लेखिका जेवण अर्धवट सोडून उठते. म्हणजेच तिने जेवण अर्धवट सोडून उठणे हे केवळ ताटावरून उठणे नव्हते तर या अंधश्रध्दांविरोधी बंड करून उठणे होते. हे व असे अनेक प्रसंग या आत्मकथनातून आलेले आहेत. दादासाहेब मोरेंच्या प्रेरणेने स्वत: लेखिकेत परिवर्तन होतेय त्याचबरोबर इतर स्त्रियांमध्येही परिवर्तन होते. संपूर्ण समाज सुधारण्यासाठी लखिकेने साहित्याच्या माध्यमातून केलेला हा प्रयत्न निश्चितच उल्लेखनीय आहे.

**निष्कर्ष:**

1. 'तीन दगडाची चूल' या आत्मकथनात पूर्वार्धात अनेक अंधश्रध्दाची वर्णने आली असली तरी त्या अंधश्रध्दा गोंधळी समाजाचा जीवनानुभव व भोगलेपणातून आलेली आहेत.
2. उत्तरार्धात मात्र दादासाहेब मोरेंनी केलेल्या सामाजिक चळवळी, अंधश्रध्दा निर्मूलन शिबिर, वेरळा विकास प्रकल्प, भटक्या जाती जमातीच्या विकासासाठी घेतलेले मेळावे इ. च्या माध्यमातून भटक्या विमुक्तांच्या परिवर्तनासाठी प्रारंभीच्या काळात केलेल्या वाटचाली व यातून भटक्यामध्ये झालेली जाणीवजागृती याचे अनेक संदर्भ येतात.
3. सुरूवातीच्या काळात आपल्या व घरच्यांच्या होणाऱ्या ससेहोलपटीमुळे दु:ख करणारी इमी लग्नानंतर मात्र मोरेंच्या कार्यप्रभावामुळे उपाशीपोटी सुध्दा एका प्रतिष्ठीत लेखकाची पत्नी म्हणून जगणे श्रेष्ठ समजते.
4. लेखिकेच्या परिवर्तनवादी भूमिकेमागे दादासाहेब मोरेंचे मोलाचे सहकार्य आहे.
5. एका भोंदू बाबाला धडा शिकविण्याच्या समाजोपयोगी कामात हातभार लागल्यामुळे लखिकेला स्वत:ला धन्यता वाटते. ही तिची भूमिका अनेकांना परिवर्तनवादी विचार करण्यास प्रवृत्त करणारी आहे.

**संदर्भ :**

1- मोरे विमल, 'तीन दगडाची चूल', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, प्रथमावृत्ती सप्टेंबर, २०००.